| MHKO030089352025 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | – | ०३.०५.२०२५ |
| | नोंदणी दिनांक | – | ०६.०६.२०२५ |
| | निकाल दिनांक | – | २८.०१.२०२६ |
| | कालावधी | – | वर्षे महिने दिवस |
| | | | ०० ०८ २५ |

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७५१८/२०२४ नि. क्र. ९/सोबत</u>**

महाराष्ट्र शासन **विरूध्द** अथर्व अमर चोरगे.

**न्या य नि र्ण य**

**(घोषित दिनांक २८ जानेवारी, २०२६)**

अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्रीमती कदम आणि आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. डी.एन.निकम यांचा सखोल युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णायीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, दि.१७/०१/२०२५ रोजी १३.५० वाजणेच्या सुमारास क्लासीक बिअर बारचे पाठीमागे उघड्यावर बोळामध्ये, कोल्हापूर येथे आरोपी १ हा स्वतःच्या व आरोपी क्र. २ च्या फायद्याकरीता कल्याण मटका जुगाराचा खेळ चालविताना जुगाराच्या साहित्यासह मिळुन आला व त्यांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमचे कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा केलेला आहे? | ...नाही. |
| २. | कोणता आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ करिता

२. सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ संभाजी नामदेव रसाळ या पंच साक्षीदारांचा जबाब नोंदविण्यात आला. सदर साक्षीदाराच्या सरतपासाचे अवलोकन केले असता, सदर साक्षीदारांने अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी साक्ष दिलेली नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराचा उलटतपास नोंदविला असता त्याच्या उलटतपासातून देखील त्यांनी अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी साक्ष दिलेली नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षाचे कथनास पुष्टी देणारी नाही. त्यामुळे त्याची साक्ष विश्वासार्ह नाही.

३. सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ निलेश प्रकाश नाझरे हे फिर्यादी यांचा जबाब नोंदविण्यात आला. ते असे कथन करतात की, दि.१७/०१/२०२५ ला पो.नि. यांनी सांगितले की, क्लासीक बिअर बारचे जवळ, ताराबाई रोड, शिवाजी पेठ, तटाकडील तालीम येथे एक इसम कल्याण मटका खेळ घेत आहे व त्यांनी छापा कारवाईचा आदेश दिला. त्यानुसार पो.हे.कॉ.डोंगरे यांनी दोन इसमांना पंच म्हणून बोलावले व त्यांना बातमीचा आशय सांगितला व पंच म्हणून येण्यास संमती घेतली. त्यानुसार सर्वजण घटनास्थळी गेले व तेथे जाऊन पाहणी केली. तेथे एक इसम पेनने काहितरी लिहून चिठ्या देत असताना दिसून आला. त्याच्यावर छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. सदर इसमास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव अथर्व अमर चोरगे असे सांगितले. सदर इसमाकडे अधिक चौकशी केली असता तो इसम विनोद रघुनाथ मोरे याच्याकरीता काम करत असल्याचे सांगितले. सदर इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून रोख रक्कम रू.२१५०/–, एक बॉलपेन व कल्याण मटकाचे स्लीपबुक असे साहित्य जप्त केले. त्यांनी जप्त मुद्देमालचा पंचनामा केला. सदर घटनेबाबतची त्यांनी फिर्याद दिली.

४. आरोपींचे विधिज्ञ श्री.डी.एन.निकम यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. त्यामध्ये त्यांनी बातमीची खात्री करण्याकरीता बोगस गिऱ्हाईक पाठविले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असल्याचे देखील साक्षीदाराने मान्य केले आहे. तसेच ते कोणत्या वाहनाने छापाकामी गेले होते

व त्याची नोंद स्टेशन डायरीला केली होती किंवा कसे याबाबत त्यांनी माहिती नसल्याचे सांगितले.

५. सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ अरूण साताप्पा आपके हे तपासी अधिकारी यांचा जबाब नोंदविण्यात आला. ते असे कथन करतात की, दि.१७/०१/२०२५ रोजी गु. र. नं.२९/२०२५ चा तपास ठाणे अंमलदार यांच्या लेखी आदेशाने त्यांच्याकडे आला. सदर आदेशासोबत फिर्याद, पंचनामा, मुद्देमाल देण्यात आला. सदरचा मुद्देमाल त्यांनी मुद्देमाल कारकून यांच्याकडे जमा केला व सदरची पावती प्रकरणात जमा केली. त्यानंतर आरोपींना फौ. प्र. सं. चे कलम ४१ अ नुसार नोटीस दिली. साक्षीदारांचे तपासटीपण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. तपासाअंती असे निष्पन्न झाले की, आरोपी क्र. १ हा आरोपी क्र. २ च्या सांगण्यावरून कमिशनवर लोकांना चिठ्ठया देऊन त्यांच्याकडून पैसे घेऊन अवैधरित्या कल्याण मटका जुगाराचा खेळ चालवित असताना मिळून आला. आरोपीविरूध्द दोषारोप सिध्द झालेने त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

६. आरोपींचे विधिज्ञ श्री. डी. एन. निकम यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. त्यामध्ये त्यांनी तपासकामी घटनास्थळी गेले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच घटनास्थळाच्या मालकीबाबत कोणताही पूरावा प्रकरणात दाखल केला नसल्याचे देखील साक्षीदाराने मान्य केले आहे. घटनास्थळावरील कोणताही साक्षीदार नोंदविला नसल्याचे देखील साक्षीदाराने मान्य केले आहे.

७. अभियोग पक्षाच्या संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींच्या विद्वान वकीलांचे युक्तिवाद एकत्रीतरित्या ऐकले. फिर्यादी यांना देण्यात आलेल्या आदेशावरून त्यांनी घटनास्थळी छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले. परंतु आरोपी क्र. १ हा स्वतःच्या फायद्याकरीता लोकांकडून पैसे घेऊन आरोपी क्र. २ करीता कमिशनवर मटका लावत असल्याचे कोणतेही पूरावे अभिलेखावर आलेले नाहीत. तसेच पोलिस स्टाफने त्यांचा अंगझडती पंचनामा केल्याचा उल्लेख दिसून येत नाही. त्यामुळे छापाकामी जाताना पोलिस स्टाफकडे काही आक्षेपार्ह वस्तू नसल्याचे किंवा पोलिस स्टाफने निपक्षःपणे छापा कारवाई केली हे अभियोग पक्ष सिध्द करत नाही. तसेच घटनास्थळाच्या कोणत्याही इसमांचे सदर कामी

जबाब घेतल्याचे दिसून येत नाही.

८. अभियोग पक्षाने हे सिध्द करणे गरजेचे आहे की, आरोपी क्र. १ हा स्वतःच्या व आरोपी क्र. २ च्या फायद्याकरीता लोकांना कल्याण मटका जुगाराच्या चिठ्ठया देऊन बेकायदेशीर व बिगर परवाना जुगाराचा खेळ चालवित होते. परंतु आरोपी हे जुगाराचा खेळ चालवित होते असे जरी आरोप असले तरी त्यांच्याकडे कोणीही गि-हाईक मिळून आलेले नाही. वास्तविक पाहता घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. त्यामुळे कोणीही इसम तेथे पंच म्हणून घेता आले असते. प्रकरणातील पंच यांनी अभियोग पक्षास मदत होईल अशी साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे पंच साक्षीदाराच्या खरेपणाबाबत साशंकता उत्पन्न होते. तसेच जप्त केलेले बुक हे कल्याण मटका जुगारातील होते याबाबत कोणताही ठोस पूरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही. तसेच आरोपी क्र. १ व २ यांच्यातील संबंध अभिलेखावर आलेले नाहीत. त्यामुळे आरोपी क्र. १ हा स्वतःचे व आरोपी क्र. २ हा मटका मालक याच्याकरीता कल्याण मटका घेत होते ही बाब सिध्द होत नाही. अभियोगपक्ष आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सबळ पुराव्याविना सिध्द करण्यास असमर्थ ठरले. सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत झाल्याचे सिध्द होत नाही. सबब, मी वरील मुद्द्याचे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता</u>**

९. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हयाचे घटक सिध्द केले नसल्याने सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत झाल्याचे सिध्द होत नाही. मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविलेला आहे. आरोपींविरुध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपींची वर नमुद गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश नोंदवित आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ अथर्व अमर चोरगे व आरोपी क्र. २ विनोद रघुनाथ मोरे यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमचे कलम १२ (अ) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केल्याचे सिध्द न झाल्याने भारतीय न्याय सूरक्षा संहिताचे कलम

२७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते व त्यांना सदर गुन्हयातून मुक्त करण्यात येते.

२. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल रक्कम रू.२१५०/– सरकारजमा करणेत यावी व कल्याण मटका जुगाराचे बुक व बॉलपेन हे मुल्यहीन असल्याने त्याचा नाश करणे न्यायोचित वाटते.

३. आरोपींचे जामीनबंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपींनी भारतीय न्याय सूरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी प्रत्येकी रक्कम रू.५,०००/– (रुपये पाच हजार) ची वैयक्तीक व तेवढ्याच रक्कमेच्या लायक बंधपत्रावर खुले करणेत येत आहे.

५. सदर निकालाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

DIPTI MALLIKARJUN BHANDE

Digitally signed by DIPTI MALLIKARJUN BHANDE
Date: 2026.01.28 17:32:30 +0530

कोल्हापूर ( श्रीमती डी. एम. भंडे)

दिनांक. २८/०१/२०२६ ४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कोल्हापूर.